भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-०७/०२/२०१७

# प्रेसनोट

## ट्रक चालकांना लुटमारी करणेचा प्रयत्न करणारे फरारी अटकेत

दि.०६/०२/२०१७ रोजी पो.उप-निरीक्षक उत्तम बुदगुडे व त्यांचे पथक असे पोलीस ठाणे हददीत पेट्रोलीग करीत असताना फिरत फिरत दत्तनगर चौक येथे आले असता **पोलीस कर्मचारी प्रदीप गुरव** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,पाच ते सहा दिवसापुर्वी मुंबई- पुणे-बेंगलोर हायवेवर ट्रकला मोटार सायकल आडवी लावुन ट्रक थांबवुन हत्याराचा धाक दाखवुन ट्रक चालकास मारहाण करुन लुटमार करणारे पळून गेलेले इसम नामे सुरज वाल्मिकी व रोहीत कदम हे नवले ब्रिज पुलाखाली रिक्षाची वाट बघत थांबलेले आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने लागलीच सदरची बातमी मा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना भ्रमणदुरध्वनीव्दारे कळविली असता त्यांनी खात्री करुन सापळा लावुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने लागलीच आम्ही आम्ही स्वता, पंच व पोलीस स्टाफ असे बातमीच्या ठिकाणी खाजगी वाहनाने जावुन सापळा लावुन वॉच केला असता बातमीत मिळालेले वर्णनाचे दोन इसम नवले ब्रिज पुलाखाली थांबलेले असल्याचे दिसल्याने बातमीप्रमाणे खात्री होताच स्टाफचे मदतीने अचानकपणे २१.३५ वा त्यांना जागीच पकडुन त्यांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांना त्यांचा नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचा नाव पत्ता **१)सुरज नरेंद्र वाल्मिकी वय-२३ वर्ष रा.छत्रपती चौक न्यु कोपरे गाव एन.डी.ए उत्तमनगर ता.हवेली जि.पुणे २) रोहीत दत्तात्रय कदम वय-२२ वर्ष रा.दांगट इंडस्ट्रीयल आदीती हॉटेलजवळ शिवणे ता.हवेली जि.पुणे** असे असल्याचे सांगितले आहे.

यातील अटक आरोपी सुरज वाल्मिकी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याचेवर वारजे,सिंहगड रोड पो.ठाणेस चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

**वर नमुद सर्व कारवाई ही मा.श्री.प्रदीप देशपांडे सो अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण विभाग पुणे ,मा.श्री.पकंज डहाणे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे,मा. श्री.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विजयसिंह गायकवाड सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीकांत शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.उत्तम बुदगुडे, पो.कर्मचारी प्रदीप गुरव, श्रीधर पाटील, विनोद भंडलकर, गणेश सुतार, समीर बागसिराज, बाबा नरळे, यांचे पथकाने केलेली आहे.**